पुढारी | बुधवार
१७ ऑक्टोबर २०१८

# विद्यापीठात वाचन प्रेरणा दिनानिमित्त दिवाळी अंकांचे प्रदर्शन

**कोल्हापूर (प्रतिनिधी) :**
भारतरत्न डॉ. ए. पी. जे. अब्दुल कलाम यांच्या जयंतीनिमित्त वाचन प्रेरणा दिवस म्हणून साजरा केला जातो. यानिमित्त विद्यापीठात बॅ. बाळासाहेब खर्डेकर ज्ञानस्रोत केंद्रामार्फत १९३२ पासून प्रकाशित झालेल्या दुर्मीळ दिवाळी अंकांचे प्रदर्शन भरविण्यात आले आहे. या प्रदर्शनाचे उद्‌घाटन प्र-कुलगुरू डॉ. शिर्के यांच्या हस्ते झाले. हे प्रदर्शन मोफत असून, १८ ऑक्टोबरपर्यंत सर्वांसाठी खुले राहणार आहे. याप्रसंगी वित्त व लेखाधिकारी व्ही. टी. पाटील, ज्ञानस्रोत केंद्राच्या संचालिका डॉ. नमिता खोत, उपग्रंथपाल डॉ. डी. बी. सुतार, सहायक ग्रंथपाल डॉ. पी. बी. बिलावर, डॉ. एस. व्ही. थोरात, डॉ. शालिनी लिहितकर आदी उपस्थित होते.